**प्रेसनोट्स**

**चाळीसगांव ग्रामिण पोलीस स्टेशन**
**जावक क्र.** /2025
**दिनांक** 25/07/2025

**प्रति,**

**मा. संपादक,**

------------------ **वृत्तपत्र**

**विषय :- वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी होणे बाबत...**

--- 000 ---

**दिनांक** 24/07/2025 रोजी 19:00 वा.चे सुमारास पोलीस उपनिरीक्षक श्री.शशिकांत रामदास पाटील **नेम. महामार्ग सुरक्षा पथक ,चाळीसगांव व त्यांचे सोबत महामार्ग सुरक्षा पथक ,चाळीसगांव येथील इतर अधिकारी व पोलीस अंमलदार असे** बोढरे ता.चाळीसगांव शिवारात चाळीसगांव ते छत्रपती संभाजीनगर रोडवर कन्नड घाटाचे खाली महामार्ग पोलीस केंद्राचे समोर मोटार वाहन कायदयाचे केसेस करीत असतांना चाळीसगांव कडुन छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी मारुती सुझकी कंपनीची ब्रेझा मॉडेल लाल रंगाची गाडी क्रमांक DL 9 CBB 7771 हिच्यात आरोपी अबुल आसिम सैयद, वय 48 वर्षे रा. दक्षिण दिल्ली हा त्याचे ताब्यातील मारुती सुझकी कंपनीची ब्रेझा लाल रंगाची गाडी क्रं. DL9C BB 7771 हीचेत वरील वर्णनाचा 43 किलो 267 ग्रॅम पॅकीग पिशवीसह वजनाचा 64,90,05,000/- रुपये किमंतीचा पांढ-या रंगाचा स्फटीक मेथ एम्फेटामाईन सदृष्य अंमली पदार्थ, मारुती सुझकी कंपनीची ब्रेझा व मोबाईल्स, बॅगा आणि रोख रक्कमसह एकुण 64,98,57,590/ रुपये किंमतीचा मुद्देमाल बेकायदेशिरपणे कब्जात बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्या बाबत पो.उपनिरी. श्री. शशिकांत पाटील यांनी चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे. येथे माहीती कळविली. त्यानंतर चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे. चे प्रभारी अधिकारी स.पो.नि. शंकर मुटेकर यांनी मा. पोलीस अधिक्षक सो. जळगाव व उपविभागीय पोलीस अधिकारी सो. अमळनेर उपविभाग, अमळनेर, अति. कार्यभार चाळीसगाव उपविभाग, चाळीसगाव यांना सदर प्राप्त माहीती बाबत कळवुन तात्काळ चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे. चे अधिकारी व अंमलदार यांचेसह कायदेशीर प्रक्रीयांचे पालन करुन घटनास्थळी पोहचुन नमुद आरोपी व त्याचे ताब्यातील वरील वर्णनाचा मेथ एम्फेटामाईन सदृष्य अंमली पदार्थ व इतर मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला व त्यांनंतर पो.उपनिरी. श्री. शशिकांत पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे. गु.रजि.नं. 241/2025 NDPS कायदा कलम 8(क), 22(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा. पोलीस अधिक्षक सो. यांचे आदेशाने पो.नि. अमितकुमार मनेळ, चाळीसगाव शहर पो.स्टे. हे करीत आहेत. नमुद आरोपी यास तात्काळ अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दि. 30/07/2025 पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक सो. महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधिक्षक, चाळीसगाव परिमंडळ, श्रीमती कविता नेरकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विनायक कोते, अमळनेर उपविभाग, अति. कार्य. चाळीसगाव उपविभाग यांचे मार्गदर्शना खाली, स.पो.नि. शंकर मुटेकर, पो.उपनिरी. प्रदीप शेवाळे, पो.उपनिरी. कुणाल चव्हाण, पो.उपनिरी. राहुल राजपुत, सफौ.. 2650 युवराज नाईक, पो.हे.कॉ. 1278 ओंकार सुतार, पो.हे.कॉ. 287 नितीन सोनवणे, पो.हे.कॉ. 172 संदीप पाटील व चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे. चे इतर अधिकारी-अंमलदार यांनी केली आहे.